**अनुसूचित जातीच्या सहकारी सूतगिरण्यांना मंजूर करण्यात आलेले दिर्घ मुदतीचे कर्ज व व्याज वसूल करण्याची पध्दत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक सूतगि-२००३/५५५/प्र.क्र.३३/ विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : २ जुलै, २००४.

**वाचा :** -१) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र.एमपीसी-१०९७ /१६३४९ /प्र. क्र.१२३/विघयो-२, दि. ४ जून, १९९८.
२) शासन शुध्दीपत्रक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र.एमपीसी-१०९७ /१६३४९ /प्र. क्र.१२३/विघयो-२, दि. २५ जून, १९९८.
३) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र.एमपीसी-१०९९ /प्र. क्र.१४४/विघयो-२, दि. ३० मार्च, २०००.
४) संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, म.रा., नागपूर यांचे पत्र क्र.कार्यासन-६ (३) /धा.क्र./१०८७/२००२, दि.१९ जानेवारी, २००२
५) संचालक, समाजकल्याण, म.रा.,पुणे यांचे पत्र क्र. विघयो-१/०२-०३/ सूगि / कर्ज वसूली /का-१४/२२, दि. १३ जानेवारी, २००३.

**प्रस्तावना :-** मागासवर्गीय (अनुसूचित जाती) सहकारी सूतगिरण्यांना दिर्घ मुदतीची कर्ज मंजूर करण्याची योजना उपरोक्त क्र. १ येथील दि.४ जुन, १९९८ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आली. दिनांक २५ जून, १९९८ आणि ३० मार्च, २००० च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय (अनुसूचित जाती) सहकारी सूतगिरण्यांना दिर्घ मुदती कर्ज मंजूर करण्यासंबंधी अटी व शर्ती सुधारीत करण्यात आल्या आहेत . परंतू दि ३० मार्च, २००० च्या शासन निर्णयातील अट क्र. ९ आणि १३ मधील तरतूद पुरेशी नसल्यामुळे कर्जाची वसूली केव्हापासून सुरु करावी, व्याजाची आकारणी कोणत्या दिनांकापासून करावी, वसूल झालेले कर्ज व व्याज कोणत्या लेखा शिर्षाखाली जमा करावयाचे, उपयोगिता प्रमाणपत्र कोणाकडून घ्यावे इत्यादी बाबतीत खुलासा होणे गरजेचे आहे. म्हणून सदर बाबी विचारात घेता, वरील दिनांक ३० मार्च, २००० च्या शासन निर्णयामधील अट क्र. ९ आणि १३ च्या बाबत सुस्पष्टता करण्याची बाब विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** (१) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. सूतगि ११२०००/प्र.क्र.१२५ /टेक्स-१(अ), दि. २.८.२००३ अनुसार सहकारी सूतगिरण्यांच्या २५२०० चात्यांसाठी रु.५३.०० कोटी प्रकल्प किंमत निश्चित केली आहे, म्हणून सूतगिरण्यांचे प्रकल्पमूल्य रु.५३.०० कोटी किंवा प्रत्यक्ष प्रकल्पमूल्य यापैकी जे कमी असेल ते विचारात घेऊन व या प्रकल्पमूल्याच्या मर्यादेत राहून भाग भांडवल व दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे.

(कृ.मा.प.)

(२) सहकार व वस्त्रोद्योग विभागाने मंजूर केलेले ४५% भाग भांडवल व सामाजिक न्याय विभागाने मंजूर केलेले ५०% दिर्घ मुदतीचे कर्ज असे एकुण प्रकल्पमुल्याच्या ९५% निधीच्या ९०% निधी सूतगिरणींना अदा केल्यानंतर २ वर्षांनी कर्ज वसुलीस सुरुवात करावी.

(३) सूतगिरणीला मंजूर करण्यात आलेल्या कर्जाचे धनाकर्ष सूतगिरणीचे अध्यक्ष व संचालक समाज कल्याण यांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याच्या दिनांकापासून व्याजाची आकारणी करण्यात यावी.

(४) कर्जाची परतफेड ६ वर्षाच्या कालावधीत एकूण २४ समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी. यातील पहिले १६ हप्ते मुद्दल व शेवटचे ८ हप्ते व्याजाचे राहतील.

(५) कर्जाची वसुली देय झाल्यानंतर थकीत कर्ज वसूल करण्यासंदर्भात संचालक समाजकल्याण यांच्याव्दारा संबंधित सूतगिरणीस तीन तीन महीन्याच्या मुदतीनंतर तीन वेळा मागणीपत्र (Demand Notice) पाठविण्यात येईल. व त्यानंतरही कर्ज वसुलीला नियमानुसार सुतगिरणीव्दारा प्रतिसाद मिळाला नाही तर ते प्रकरण थकीत कर्जाच्या वसुलीबाबत संबंधीत तहसीलदार यांच्याकडे वसूलीसाठी सोपविण्यात येईल.

(६) व्याजाचा दर, दंडनीय व्याज इत्यादी वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय कृषि औद्यागिक विकास बँक ,नवी दिल्ली (NABARD) व्दारा निश्चित केल्याप्रमाणे राहील.

(७) सूतगिरणीच्या संयुक्त खात्यात जमा झालेल्या रकमेवरील व्याजाची रक्कम लाभार्थी सूतगिरणीस वापरण्यास परवानगी देण्यात यावी. त्यावर शासनाचा हक्क राहणार नाही.

(८) शासनाकडून जे दिर्घ मुदतीचे कर्ज दिले जाईल त्या कर्जाची संचालक समाज कल्याण व गिरणीचे अध्यक्ष यांच्या संयुक्त खात्यातून रक्कम उचल मागतांना गिरणीने प्रथम प्रस्ताव सादर करुन संबंधित जिल्हाधिकारी यांचे कडून रक्कम खर्च करण्यासाठी लेखी स्वरुपात परवानगी घ्यावी व त्या परवानगीच्या आधारे संचालक, समाजकल्याण यांनी उचल मंजूर करावी आणि त्याच बाबीकरिता रक्कम खर्च करुन उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावे. कर्जाच्या रकमेचा विनियोग योग्य प्रकारे न झाल्याचे आढळल्यास किंवा अन्य गैरप्रकार मुळे कर्जाची रक्कम अनुज्ञेय नसल्याचे आढळल्यास दिलेली रक्कम महसूली थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५५/०४/व्यय-१४, दिनांक २५/६/२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.सो.स्वर्गीया)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
~~संचालक, समाजकल्याण~~ महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग,म.रा., नागपूर.
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
जिल्हा कोषागार अधिकारी,सोलापूर, कोल्हापूर, लातूर.

३/-